NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक ११.११.२०२६ बुधवार

(कामगिरी)

१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक १०.११.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०५ केसेसमध्ये ०८ ईसमावर कारवाई करून एकुण १७,२०,५७०/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. त्याचप्रमाणे, दिनांक १०.११.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ११.११.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०२ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, ओव्हरस्पिडींग कलम ११२/१८३ मोवाका अन्वये ०७ केसेस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ९३ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १२७ मोवाका अन्वये ८४ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये ६७ केसेस, रॉंग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ५४ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ४२ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ८० केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये ०५ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये २४ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये २४ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १,०४५ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे कलम १८४ (सि) अन्वये १४ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये १९ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,६८१ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ४,०८,७५०/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

३) गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथकाची कामगिरी :– जिवे ठार मारणाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक १०.११.२०२६ चे १६.३० वा. चे सुमारास, फिर्यादी करण प्रकाश जाधव, वय २६ वर्ष, रा. प्रेमनगर, झेंडा चौक, लोधीपुरा, शांतीनगर, नागपुर हा कामावरुन घरी परत येत असता, घराजवळील गजानन मंदीर जवळ फिर्यादीचे वस्तीत राहणारा आरोपी इसम नामे ओमकार उर्फ ओमी याने येऊन 'चल रेल्वे पटरी के तरफ घुम के आत है' असे म्हणुन, फिर्यादीस पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत मेंहदीबाग रेल्वे पटरीकडे घेऊन गेला. तिथे आरोपीने फिर्यादीसोबत 'तु आजकल मेरी बात नही सुनता है, आज तेरा गेम करता हु' असे म्हणुन फिर्यादीसोबत वाद घालुन, हातबुक्कीने मारहाण करीत असता, फिर्यादी आपला बचाव करण्याचे उद्देशाने तेथुन पळु लागले. आरोपीने फिर्यादीचा पाठलाग करून, त्याचेजवळील धारदार शस्त्राने फिर्यादीस जिवे ठार मारण्याचे उद्येशाने त्यांचे पाठीवर, ओठावर व तोंडावर वार करुन जखमी केले. जखमी फिर्यादीचा उपचार मेयो हॉस्पिटल

येथे करण्यात आला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे आरोपीविरूध्द कलम १०९(१),११५(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथकाचे अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून व गोपनिय बातमीदार मार्फतीने मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, गुन्ह्यातील आरोपी ओमप्रकाश उर्फ ओमी सतिष यादव, वय १९ वर्षे, रा. प्रेमनगर, श्रीरामवाडी, झेंडा चौक, शांतीनगर, नागपुर यास ताब्यात घेतले. त्यास गुन्हेसंबंधाने विचारपुस केली असता, त्याने वर नमुद गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीस पुढील कार्यवाहीस्तव यशोधरानगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (गुन्हेशाखा), मा. श्री. वैभव जाधव सहायक पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनात, पोनि. पप्पु कादरी, पोहवा. रोशन तिवारी, नितीन वर्मा व अजय शुक्ला यांनी सायबर सेलचे विशेष मदतीने केली.



<u>३) बेलतरोडी पोलीसांची कामगिरी :— एम.डी. पावडर विक्रीकरीता बाळगणाऱ्या आरोपींना अटक.</u>

दिनांक १०.११.२०२६ चे ०९.३० वा. ते १०.०० वा. चे सुमारास, बेलतरोडी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना नागपूर—वर्धा रोडवरील खापरी परिसरातील भारत पेट्रोल पंपजवळील न्यु पंजाबी ढाबा समोर एक पांढऱ्या रंगाची अर्टिगा कार क्र. सी.जी ०८ वाय ५७६० मधील इसम संशयीत वाटल्याने, त्यांनी कारजवळ जाऊन पाहणी केली असता, कारमध्ये चार इसम दिसुन आले. त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांची नावे १) भुषण रमेश कुरसंगे, वय ३६ वर्ष, रा. चिचभवन, वर्धा रोड, नागपुर २) नितेश सुभाष शाहु, वय २६ वर्ष, रा. दहेगाव रंगारी, सावनेर रोड, नागपूर ३) सौरभ सतिष लष्करे, वय २३ वर्ष, रा. बोबडे आटा चक्कीजवळ, चिचभवन, वर्धा रोड, नागपुर व ४) मोहीत गजानन भाजीपाले, वय २३ वर्ष, रा. जायका हॉटेलचे बाजुला, डोंगरगाव, वर्धा रोड, नागपूर असे सांगितले. त्यांचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरुन, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन, पंचासमक्ष त्यांची व कारची झडती घेतली असता, आरोपी क्र. १ चे ताब्यात त्याने घातलेल्या लोअर पॅन्टचे खिशात एका पांढरे झिपलॉक पन्नीमध्ये १८.३४ ग्रॅम वजनी एम.डी. पावडर मिळुन आली. आरोपींना एम.डी पावडर बाबत विचारणा केली असता, त्यांनी विक्रीकरीता आणल्याचे सांगितले. आरोपींचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०२ मोबाईल फोन व अर्टिगा कार असा एकुण १६,०६,७००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींचा अभिलेख तपासला असता, आरोपी क्र. १ हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याचे दिसुन आले. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्रीकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२२(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे बेलतरोडी येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नागरे पाटील पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग), मा. श्रीमती रश्मिता राव, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ४), मा. श्री नरेंद्र हिवरे, सहा. पोलीस आयुक्त (अजनी विभाग) यांचे मार्गदर्शानाखाली, वपोनि. रविंद्र नाईकवाड, पोउपनि. संतोष आंधळे, पोहवा. सुहास शिंगणे, सचिन लाचरवार, सुरेंद्र बोपचे, पोअं. विवेक श्रीपाद व मनिष लांडे यांनी केली.



(गुन्हे)

१) पोलीस ठाणे पाचपावली :— हद्दपार ईसमास शस्त्रासह अटक.

दिनांक १०.११.२०२६ चे २०.४५ ते २१.३० वा. चे दरम्यान, पाचपावली पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, कलकत्ता रेल्वे लाईन फाटकाजवळ एक हद्दपार इसम शस्त्र बाळगुन उभा आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे प्राप्त वर्णनाचा इसम दिसुन आला. त्याचेजवळ जात असता, तो पोलीसांना पाहुन पळु लागला. पोलीसांनी त्याचा पाठलाग करून त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव तुषार उर्फ पितु किरण पराते, वय १९ वर्षे, रा. ठक्करग्राम, पाचपावली, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कंबरेत एक धारदार काटेरी दात असलेला लोखंडी चाकु कि. १,०००/—रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.. त्यास पोलीस ठाणे येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०३ यांचे हद्दपार आदेश क्र. ३१/२०२६ दिनांक २९.०९.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०१ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्रासह समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोहवा. विनोद समदुरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे सपोनि. गजानन अंसापुरे ९१३००५२०६३ यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १४२,१३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे जरीपटका :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक ०७.११.२०२६ चे १०.०० वा. ते दिनांक १०.११.२०२६ चे १८.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत, प्लॉट नं. २१, नुरी कॉलनी, नारा रोड, जरीपटका, नागपूर येथे राहणारे फिर्यादी अहमद मुस्तफा खान, वय ४४ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह त्यांचे नातेवाईकाचे घरी यवतमाळ येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप डुप्लीकेट चाबीने उघडुन, घराचे आंत प्रवेश करून, बेडरूममधील दिवाणमध्ये ठेवलेले सोन्याचे वेगवेगळे दागिने वजनी ६५ ग्राम किंमती ३,२५,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे पोउपनि. सुनिल गोरडे ९१५८३५२५८५ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

३) पोलीस ठाणे वाठोडा :— गंभीर अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक ०९.११.२०२६ चे २२.०० वा. चे सुमारास, फिर्यादीचा मावसभाऊ नामे समीर इंद्रकुमार मेंढे, वय २४ वर्ष, रा. प्लॉट क्र. २२७, जिजामाता नगर—१, दुर्गामंदीर जवळ, खरबी, नागपूर हा त्याची ॲक्टिवा मोपेड क्र. एम.एच ४९ ए.डब्ल्यु १७५५ ने पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत हारोडे ले—आऊट जवळील सिमेंट रोडने जात असता, प्रधानमंत्री आवास योजना, नाल्याजवळ एका डिओ मोपेड क्र. एम.एच ४० सी.पी ९१४० चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन ट्रिपलसिट व रॉग साईडने निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे मावसभावाचे मोपेडला धडक दिली. अपघातामध्ये फिर्यादीचा मावसभाऊ समीर मेंढे हा वाहनासह खाली पडुन गंभीर जखमी झाला. त्यास उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल, ट्रामा सेंटर येथे दाखल करण्यात आले असुन, त्याचेवर उपचार सुरु आहे.

याप्रकरणी फिर्यादी साहील सुनिल मेश्राम, वय २२ वर्ष, रा. प्लॉट क्र. २२७, जिजामाता नगर—१, दुर्गा मंदीर जवळ, खरबी, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाठोडा येथे पोउपनि. संजय आठवले ९९२३६१८०३५ यांनी डिओ मोपेड वाहन चालक आरोपीविरूध्द कलम २८१,१२५(ब) भा.न्या.सं., सहकलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

स्वा/—
(अमित देशमुख)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.